| | | |
|---|---|---|
| MHRT100004392024 | प्रकरण दाखल तारीख | २५/०९/२०२४ |
| | प्रकरण नोंदल्याची तारीख | २५/०९/२०२४ |
| | निकाल दिनांक | ०४/०४/२०२६ |
| | कालावधी | वर्ष महीने दिवस<br>०१ ०६ १४ |

**भाग 'अ'**
**(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परीच्छेद (I) )**
**राजापूर येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग यांचे न्यायालयात**
**(पिठासिन अधिकारी - श्रीमती एस. एस. हाके)**

| **नियमित फौजदारी खटला क्र.३०/२०२४** | **निशाणी क्र.३८** |
|---|---|
| **खटला क्रमांक** | **नियमित फौजदारी खटला क्र.३०/२०२४** |
| **गुन्हा रजिस्टर क्रमांक व पोलिस ठाणे अथवा राज्य उत्पादन शुल्क** | गु.र.क्र.८८/२०२४, राजापूर पोलीस ठाणे ता.राजापूर, जि.रत्नागिरी |
| **अभियोग पक्ष** | **महाराष्ट्र शासनतर्फे राजापूर पोलीस ठाणे.** |
| **प्रतिनिधीत्व** | **सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. बी. एस. सुपेकर** |
| **विरुध्द** | |
| **आरोपी** | **१. सज्ञाद अब्दुल रेहमान मस्तान**<br>वय – ५० वर्षे, धंदा - व्यापार,<br>रा. डोंगर मुसलमानवाडी, ता. राजापूर,<br>जि. रत्नागिरी.<br>**२. शाहीन सज्ञाद मस्तान**<br>वय – ३९ वर्षे, धंदा - गृहिणी,<br>रा. डोंगर मुसलमानवाडी, ता. राजापूर,<br>जि. रत्नागिरी. |
| **प्रतिनिधीत्व आरोपीतर्फे** | **विद्वान विधीज्ञ श्री. पी. एम. हर्डीकर.** |

भाग ब
(फौजदारी नियमावली प्रकरण परीच्छेद ४४ **(II))**

| | |
|---|---|
| गुन्हयाची तारीख | ३१/०७/२०२४ |
| फिर्याद पोलिस ठाण्यात नोंद झाल्याची तारीख | ३१/०७/२०२४ |
| दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केल्याची तारीख | २५/०९/२०२४ |
| आरोपीविरुध्द दोषारोप ठेवल्याची तारीख | १३/११/२०२४ |

| | |
|---|---|
| पुरावा नोंदविण्यास प्रारंभ केल्याची तारीख | २४/०२/२०२६ |
| निकालाची तारीख | ०४/०४/२०२६ |
| जर शिक्षा दिली तर त्या आदेशाची तारीख | संबंधीत नाही. |

| **आरोपी क्र.** | **आरोपीचे नाव** | **अटकेची तारीख** | **जामीनावर सोडलेची तारीख** | **दोषारोप ठेवलेले गुन्हे** | **निर्दोष मुक्त केले की शिक्षा केली** | **दिलेली शिक्षा** | **फौ.प्र.सं. कलम ४२८ संपरिक्षेचे दरम्याने निरुध्द केलेल्या कालावधी** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सज्ञाद अब्दुल रेहमान मस्तान | आरोपी भा.न्या. सं.कलम ३५(३) प्रमाणे नोटीस दिली. | १३/११/ २०२४ | भारतीय न्याय संहिता कलम ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(१)(२), ३(५). | आरोपीस निर्दोष मुक्त केले. | लागू नाही. | -------- |
| २ | शाहीन सज्ञाद मस्तान | आरोपी भा.न्या. सं.कलम ३५(३) प्रमाणे नोटीस दिली. | १३/११/ २०२४ | भारतीय न्याय संहिता कलम ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(१)(२), ३(५). | आरोपीस निर्दोष मुक्त केले. | लागू नाही. | -------- |

भाग क

**(**फौजदारी नियमावली प्रकरण परीच्छेद ४४ **(III))**

## साक्षीदारांची यादी

### अ. सरकारी साक्षीदारांची यादी

| **साक्षीदार क्रमांक** | **नाव** | **(पुराव्याचे स्वरुप ) साक्षीदाराची भुमीका** | **निशाणी क्रमांक** |
|---|---|---|---|
| साक्षीदार क्र.१ | अन्वर फकीर शेमले | फिर्यादी साक्षीदार | २१ |
| साक्षीदार क्र.२ | हर्षदा अमित चव्हाण | तपासी अधिकारी | २७ |

### ब. बचावाचे साक्षीदार - निरंक

### क. अभियोगपक्षाच्या / बचावपक्षाच्या कागदपत्रांच्या निशाणींची यादी

## अभियोगपक्षाच्या कागदपत्रांच्या निशाणींची यादी

| अनु.क्र. | कागदपत्रांचे वर्णन | निशाण |
|---|---|---|
| १. | तपासकाम करण्याबाबतचे लेखी आदेश | २८ |
| २. | घटनास्थळ पंचनामा नकाशासह | २९ |
| ३. | मुद्देमाल पावती | ३० |
| ४. | ६३-४ प्रमाणे प्रमाणपत्र | ३१ |
| ५. | ३५-३ प्रमाणे नोटीसा | ३२ व ३३ |

बचावपक्षाच्या कागदपत्रांच्या निशाणींची यादी **-** निरंक

**मुद्देमाल**

| मुद्देमाल वस्तू क्र. | वर्णन |
|---|---|
| १. | एक चिवा बांबूचा भरीव दांडका त्याला पाच पेरे आहेत. एक बाजू टोकदार व एक बाजूस सपाट आहे. त्यांची लांबी ३ फुट ७ इंच किं.सु.००.००/-. |

## न्यायनिर्णय
## (घोषणा दिनांक ०४/०४/२०२६)

**०१.** प्रस्तुतचा खटला आरोपींविरुध्द भारतीय न्याय संहिता, २०२३ (यापुढे ज्यास थोडक्यात 'भा.न्या.सं.' असे संबोधले आहे.) चे कलम ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(१)(२) सह कलम ३(५) अन्वये शिक्षापात्र अपराधासाठी दाखल करण्यात आलेला आहे.

**अभियोगपक्षाची हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणे -**

**०२.** यातील फिर्यादी व आरोपी हे एकाच बिल्डींगमध्ये मौजे डोंगर मुसलमानवाडी येथे राहतात. यातील फिर्यादी यांनी आरोपी एजंट सज्ञाद मस्तान यांचेकडून बिल्डर आदिल काझी यांनी डोंगर येथे बांधलेल्या बिल्डींगमधील सुमारे दीड वर्षापूर्वी फ्लॅट विकत घेतलेला आहे. सदर विकत घेतलेल्या फ्लॅट नं.२२०ब३ या फ्लॅटचे अद्यापर्यंत रजिस्ट्रेशन झालेले नसल्याने दिनांक ३१/०७/२०२४ रोजी २०.३०

वाजताचे दरम्याने मौजे डोंगर, ता. राजापूर, जि. रत्नागिरी येथे काझी प्लाझा या बिल्डींग खाली फिर्यादी यांनी आरोपी यांना हाक मारुन रजिस्ट्रेशन बाबत विचारणा केली असता आरोपी क्र.१ याने खाली येवून "तुम्ही रुम १२ लाख रुपयांना नाही तर १२.५ लाख रुपयांना घेतलेली आहे आणि मी तेवढेच पैसे घेणार, नाहीतर तुम्ही रुम खाली करुन निघून जा" असे बोलून फिर्यादी यांना शिवीगाळी करण्यास सुरुवात केली. त्यावर फिर्यादी यांनी त्यांना शिवीगाळी करु नको असे सांगत असताना आरोपी यांनी न ऐकता फिर्यादी यांच्या उजव्या कुशीत हाताने मारले व ते वरती पायरीवर उभे असल्याने पायरीवरुन पावसाच्या पाण्यावरुन त्यांचा पाय घसरुन ते खाली पडले व त्यांचे डोके पायरीवर आपटून फुटून रक्त येवू लागले. फिर्यादी यांनी त्यांना उठवत असताना आरोपी यांनी तेथे असलेल्या बांबूची काठी घेवून फिर्यादी यांच्या डाव्या पायावर मारले, त्यानंतर आरोपी क्र.२ ही खाली आली व तिने फिर्यादी यांना खाली ढकलून दिले त्यावेळी फिर्यादी हे त्यांच्या फ्रॅक्चर झालेल्या पायावर पडले व त्यांना मुका मार लागला व त्यानंतर आरोपी क्र.१ व २ यांनी दोघांनी बांबूच्या काठीने फिर्यादी यांच्या डाव्या पायावर मारले व मुका मार दिला व शिवीगाळ करुन त्यांनी जीवे मारण्याची व फिर्यादी यांच्या मुलाचे करीयर बरबाद करण्याची धमकी दिली. त्यामुळे फिर्यादीने आरोपींविरुध्द पोलीसांत फिर्याद दाखल केलेवरुन भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(१)(२) सह कलम ३(५) गुन्हयांअंतर्गत राजापूर पोलीस ठाणे गुन्हा क्र.८८/२०२४ दाखल करणेत आला.

**०३.** ठाणे अंमलदार राजापूर पोलीस ठाणे यांनी त्यानंतर वर नमुद कलमाच्या अपराधाकरीता गुन्हा क्र.८८/२०२४ नोंदविला आणि त्याचा तपास अधिकारी एच. ए. चव्हाण मपोहेकॉ/१३११, राजापूर पोलीस ठाणे यांच्याकडे दिला. तपासादरम्यान साक्षीदारांचे जबाब नोंदविले. घटनास्थळ पंचनामा दोन पंचासमक्ष करण्यात आला. तसेच आरोपींना भा.ना.सु.सं.कलम ३५(३) प्रमाणे नोटीस देणेत आली. त्यानंतर तपासाअंती आरोपींविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

०४. आरोपींविरुध्द भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(१)(२) सह कलम ३(५) चे अपराधाकरीता आरोपींना निशाणी क्र.७ अन्वये दोषारोप मराठी भाषेतून समजावून सांगितला असता आरोपींनी त्यांना गुन्हा कबूल नसल्याचे सांगितले. त्याबाबत सदर आरोपींचे निवेदन अनुक्रमे निशाणी क्र.८ व ९ येथे नोंदविण्यात आलेले आहे, त्यामुळे प्रकरण पुढे चालविण्यात आले.

**०५.** अभियोगपक्षातर्फे याकामी दोन साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली. आरोपींविरुध्द प्रस्तुत कामी कोणताही पुरावा आलेला नसल्यामुळे आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) नुसार जबाब नोंदविणेत आला नाही.

**०६.** अभियोगपक्षाने सादर केलेल्या पुराव्यावरुन दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला असता खालील मुद्दे निदर्शनास येतात त्यावरील निष्कर्ष व कारणमिमांसा पुढीलप्रमाणे -

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | दिनांक ३१/०७/२०२४ रोजी २०.३० वाजताचे सुमारास मौजे डोंगर, ता. राजापूर येथे काझी प्लाझा या बिल्डींग खाली आरोपी क्र.१ व २ यांनी संगनमताने फिर्यादी याचे उजव्या कुशीत हाताने मारले तसेच पायावर काठीसारख्या घातक शस्त्राने मारून इच्छापूर्वक जबर दुखापत केली आणि अशाप्रकारे भा.न्या.सं. कलम ११८(१) सह कलम ३(५) नुसार गुन्हा केला असे अभियोगपक्षाने शाबीत केले आहे काय ? | **नाही.** |
| २. | वर नमूद दिवशी, ठिकाणी व वेळी आरोपींनी एकमेकांशी संगनमत करुन फिर्यादीस काठीने मारहाण करुन इच्छापूर्वक दुखापत केली आणि अशाप्रकारे भा.न्या.सं. कलम ११५(२) सह कलम ३(५) नुसार गुन्हा केला असे अभियोगपक्षाने शाबीत केले आहे काय ? | **नाही.** |
| ३. | वर नमूद दिवशी, ठिकाणी व वेळी आरोपींनी एकमेकांशी संगनमत करुन फिर्यादीस शिवीगाळ करुन त्यांचा जाणीवपूर्वक व स्वेच्छापूर्वक अपमान केला व त्यांचे नातेसंबंधात त्यांना | |

| | | |
|---|---|---|
| | जाणूनबुजून प्रक्षोभन दिलेले सार्वजनिक शांततेचा भंग केला आणि अशाप्रकारे भा.न्या.सं. कलम ३५२ सह कलम ३(५) नुसार गुन्हा केला असे अभियोगपक्षाने शाबीत केले आहे काय ? | **नाही.** |
| ४. | वर नमूद दिवशी, ठिकाणी व वेळी आरोपींनी एकमेकांशी संगनमत करुन फिर्यादीस ठार मारण्याची धमकी देवून फौजदारीपात्र धाकदपटशा दाखविला आणि अशाप्रकारे भा.न्या.सं. कलम ३५१(१)(२) सह कलम ३(५) नुसार गुन्हा केला असे अभियोगपक्षाने शाबीत केले आहे काय ? | **नाही.** |
| ५. | आरोपींनी कोणता अपराध केल्याचे शाबीत झाले आहे काय ? | **आरोपींना दोषमुक्त करण्यात येते.** |

**<u>कारणमिमांसा</u>**

**<u>मुद्दा क्रमांक १ ते ४ करीता -</u>**

**०७.** मुद्दा क्र.१ ते ४ हे एकमेकांशी संलग्न असल्याने पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्याकरीता मुद्दा क्र.१ ते ४ हे चर्चेकरीता एकत्रात घेण्यात आले आहेत.

**०८.** आरोपींविरुध्दचा दोषारोप सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षाने साक्षीदार पंच अन्वर फकीर शेमले (अ.सा.क्र.१) याची साक्ष निशाणी क्र.२१ येथे व तपासी अधिकारी हर्षदा अमित चव्हाण (अ.सा.क्र.२) यांची साक्ष निशाणी क्र.२७ येथे नोंदविण्यात आलेली आहे.

**०९.** प्रस्तुत केसकामी नोंदविणेत आलेल्या साक्षीदारांच्या साक्षीपुराव्याचे अवलोकन केले असता यातील फिर्यादी अन्वर फकीर शेमले (अ.सा.क्र.१) याच्या साक्षीपुराव्याचे अवलोकन केले असता सदर साक्षीदाराने त्याचे सरतपासात त्याने सदरची फिर्याद गैरसमुतीतून दिल्याचे सांगितले असे सांगितले व आरोपींविरुध्द त्याला

काहीही सांगायचे नसून त्याची आरोपींविरुध्द कोणतीही तक्रार नसल्याचे देखील सांगितले आहे. सदर साक्षीदाराने त्याच्या साक्षीपुराव्यात अभियोयगपक्षास सहकार्य केलेले नाही. त्यामुळे अभियोगपक्षाच्या वतीने सदर साक्षीदारास सुचक प्रश्न विचारण्यात आले परंतू, अभियोगपक्षास सहकार्य होईल असा पुरावा अभिलेखावर आलेला नाही.

**१०.** अभियोगपक्षातर्फे तपासी अधिकारी हर्षदा अमित चव्हाण (अ.सा.क्र.२) यांच्या साक्षीपुराव्याचे अवलोकन केले असता सरतपासामध्ये साक्षीदार यांनी कथन केले की, राजापूर पोलीस ठाणे अंतर्गत गु.र.क्र.८८/२०२४ ची नोंद करणेत आली होती असून सदर गुन्हयाचे तपासकाम वरिष्ठांच्या आदेशा(नि.क्र.२८)प्रमाणे त्यांच्याकडे देण्यात आले होते. तपासकामी त्यांनी घटनास्थळाला भेट देवून दोन पंचासमक्ष घटनास्थळाचा नकाशासह पंचनामा (नि.क्र.२९) केला, पंचनामा करतेवेळी घटनास्थळाचे फोटो काढण्यात आले होते, मुद्देमाल पावती(नि.क्र.३०) फाडण्यात आली तसेच याकामी फोटो काढल्याबाबत ६३-४ प्रमाणे प्रमाणपत्र(नि.क्र.३१) घेवून याकामी दाखल करण्यात आले. त्यानंतर गुन्हयातील आरोपींना कलम ३५(३) प्रमाणे नोटीस (नि.क्र.३२ व ३३) देवून सोडण्यात आले, त्यानंतर साक्षीदारांची तपासटिपणे नोंदविली. तपासाअंती आरोपींविरुध्द सबळ पुरावा मिळून आल्याने मे. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

**११.** प्रस्तुत केसकामी अभियोगपक्षाने सादर केलेला साक्षीपुराव्याचे अवलोकन केले असता यातील फिर्यादी अन्वर फकीर शेमले (अ.सा.क्र.१) याने त्याचे साक्षीपुराव्यात त्याने गैरसमजुतीतून तक्रार दिल्याचे व त्याची आज रोजी आरोपीसोबत कोणतीही तक्रार नसल्याचे सांगितले. तसेच त्याची आरोपीसोबत तडजोड झाल्याचे देखील सांगितले आहे. आरोपीतर्फे घेणेत आलेल्या उलटतपासामध्ये देखील सदर साक्षीदाराने त्याने केवळ गैरसमजुतीतून आरोपींविरुध्द तक्रार दिल्याचे व त्याची आरोपींसोबत समन्वयाने तडजोड झालेली असल्याचे सांगितले आहे.

**१२.** एकंदरीत प्रस्तुत केसकामी असलेल्या पुराव्याचे तोंडी व कागदोपत्री पुराव्याचे एकत्रात अवलोकन केले असता त्यामध्ये सुसंगता दिसून येत नाही. तसेच याकामी नोंदविणेत आलेल्या फिर्यादी अन्वर फकीर शेमले (अ.सा.क्र.१) यांच्या साक्षीपुराव्याचे अवलोकन केले असता आरोपी विरुध्द कोणताही पुरावा दिसून येत नाही. त्यामुळे प्रस्तुत गुन्हयाचे कृत्य आरोपींनीच केले ही बाब सिध्द करणेकरीता अभिलेखावर कोणताही सबळ व संयुक्तिक पुरावा आलेला नाही. त्यामुळे याकामी अभियोगपक्षाने आरोपींनी सदर गुन्हयाचे कृत्य केले ही बाब सबळ व संयुक्तिक पुराव्यानिशी शाबीत केली असे म्हणता येणार नाही. तसेच सदर गुन्हयातील कलम हे तडजोड करण्यापात्र आहे. प्रस्तुत केसमधील फिर्यादी अन्वर फकीर शेमले (अ.सा.क्र.१) याने त्याची आरोपींसोबत तडजोड झाल्याचे त्याच्या पुराव्यादरम्यान सांगितलेले आहे. त्यामुळे प्रस्तुत केसकामी अभिलेखावर आलेल्या पुराव्यावरुन अभियोगपक्षाच्या केसप्रमाणे आरोपींनी सदर भा.न्या.सं. कलम ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(१)(२), सह कलम ३(५) अन्वये गुन्हा केल्याचे शाबीत होत नसल्याचे दिसून येते. त्याकरीता मुद्दा क्र.१ ते ४ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदविणेत येतात.

**<u>मुद्दा क्रमांक ५ करीता -</u>**

**१३.** वर नमुद मुद्दा क्र.१ ते ४ करिता केलेल्या चर्चेनुसार दिसून आलेल्या परिस्थितीत, अभियोगपक्षाच्या साक्षीदाराची साक्ष ही आरोपींनी अभियोगपक्षाचे कथनानुसार गुन्हयाचे कृत्य केले असल्याचा निष्कर्ष काढणेसाठी निःसंशय सबळ पुरावा ठरत नाही. उपलब्ध पुरावा पाहता दिनांक ३१/०७/२०२४ रोजी २०.३० वाजताचे दरम्याने मौजे डोंगर, ता. राजापूर, जि. रत्नागिरी येथे आरोपी क्र.१ व २ यांनी संगनमत करुन आरोपी क्र.१ याने फिर्यादी यांच्या उजव्या कुशीत हाताने मारले तसेच बांबूची काठी घेवून फिर्यादी यांच्या डाव्या पायावर मारले, त्यानंतर आरोपी क्र.२ ही खाली आली व तिने फिर्यादी यांना खाली ढकलून दिले त्यावेळी फिर्यादी हे त्यांच्या फ्रॅक्चर झालेल्या पायावर पडले व त्यांना मुका मार लागला व त्यानंतर आरोपी क्र.१ व २ यांनी दोघांनी

बांबूच्या काठीने फिर्यादी यांच्या डाव्या पायावर मारले व मुका मार दिला व शिवीगाळ करुन त्यांनी जीवे मारण्याची व फिर्यादी यांच्या मुलाचे करीयर बरबाद करण्याची धमकी दिली व त्याद्वारे आरोपी क्र.१ व २ यांनी भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(१)(२) सह कलम ३(५) अन्वये शिक्षापात्र गुन्हा केला आहे, असे अभियोगपक्षाने निःसंशयपणे सिध्द केलेले नाही. सबब, वरील कारणास्तव आरोपींनी भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(१)(२) सह कलम ३(५) या गुन्ह्यातून दोषमुक्त करण्यात येते. त्यामुळे मुद्दा क्र.५ करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | आरोपी क्र.१ सज्ञाद अब्दुल रेहमान मस्तान व आरोपी क्र.२ शाहीन सज्ञाद मस्तान यांची भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(१)(२) सह कलम ३(५) या गुन्हयातून भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम २७१(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते. |
| २. | आरोपीचे जामीन विसर्जीत करण्यात येत आहे. |
| ३. | प्रस्तुत प्रकरणामध्ये जप्त करणेत आलेला मुद्देमाल नामे एक चिवा बांबुचा भरीव दांडका त्याला पाच पेरे असलेला हा मुद्देमाल मुल्यहीन असल्यामुळे अपिल कालावधीनंतर त्याची नियमाप्रमाणे विल्हेवाट करणेत यावी. |
| ४. | आरोपींचे कलम ४३७-अ फौजदारी प्रकिया संहितेनुसार प्रत्येकी रु.१५,०००/- (अक्षरी रक्कम रुपये पंधरा हजार मात्र) इतक्या रक्कमेचा पूर्वीचा वैयक्तीक जातमुचलका व जामीन बंधपत्र पुढे चालू ठेवणेत येते. |

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करणेत आला.)

SWARANJALI SUDHAKAR HAKKE
Digitally signed by SWARANJALI SUDHAKAR HAKKE
Date: 2026.04.06 18:02:17 +0530

**दिनांक- ०४/०४/२०२६** **(एस. एस. हाके)**
**राजापूर** **न्यादंडाधिकारी प्रथम वर्ग, राजापूर.**

CERTIFICATE

"Judgment/Order in :- Regular Criminal Case No. 30/2024

I affirm that the contents of this Pdf file judgment/order are same words as per original judgment/order.

Name of Stenographer:- M. N. Patil

Court Name :- Civil & Criminal Court, Rajapur.

Date of Decision :- 04-04-2026

Judgment signed by P.O. on :- 06-04-2026.

Judgment uploaded on :- 06-04-2026.